| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | |
|---|---|
| दूरध्वनी :<br>०२४०-२४०२४१२-१७ | पत्ता :<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>पानचक्की रोड, औरंगाबाद |
| ईमेल : deangmca@gmail.com | वेबसाईट : www.gmcaurangabad.com |

# जहिरात -०२

# (करार/कंत्राटी पदे)



## Super Specialty Block

## (DEDICATED COVID HOSPITAL BUILDING)

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | |
|---|---|
| दूरध्वनी :<br>०२४०-२४०२४१२-१७ | पत्ता :<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>पानचक्की रोड, औरंगाबाद |
| ईमेल : deangmca@gmail.com | वेबसाईट : www.gmcaurangabad.com |


दिनांक. ०७/ ०५/२०२०

## जाहिरात (करार/कंत्राटी पदे)

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद मार्फत कोरोना (कोविड-१९) विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी व इतर कोरोना रोगाच्या कामासंदर्भात ठराविक वेतनावर कंत्राटी पध्दतीने पदे भरणे संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले आहे.

मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद यांनी कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना कंत्राटी स्वरुपात काम करण्यास्तव स्वेच्छेने राष्ट्रीय आपत्ती निवारणासाठी अर्ज करावे, असे आवाहन केले आहे.

अपेक्षित पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | पद | एकत्रित ठराविक मानधन | शैक्षणिक अर्हता | एकूण पदे | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ड्यूटी मेडिकल ऑफिसर (DMO-2) | ३५,०००<br>३०,००० | बी.ए.एम.एस<br>बी.एच.एम.एस.<br>(बीएएमएस डॉक्टरांना प्राधान्य दिले जाईल) | ३० | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरिता ४३ वर्षे |

**अटी व शर्ती :**

१) इच्छुक उमेदवारांनी दिनांक ८-५-२०२० ते १३-५-२०२० रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या ईमेल आयडीवर सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज व जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव (आवश्यक असल्यास) ही कागदपत्रे शक्यतो एकाच पीडीएफ फाईलमध्ये सादर करावी. मुदतीनंतर ईमेल प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे, कुरियर अथवा प्रत्यक्षात अर्ज स्वीकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) प्राप्त अर्जांमधून निवड करण्यासाठी शैक्षणिक अर्हतेच्या गुणवत्तेनुसार निवड यादी लावण्यात येईल.

३) पात्र व निवड झालेल्या उमेदवारांची यादी www.gmcaurangabad.com या संकेतस्थळावर दिनांक १६-५-२०२० रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

४) निवड झालेल्या उमेदवारांना कोविड रुग्णांसाठी विशेष इमरतीमध्ये नियुक्ती देण्यात येईल.

५) वरील सर्व कंत्राटी पदांना सुरुवातीला तीन महिन्यासाठी व त्यानंतर पुन्हा गरजेनुसार नियुक्ती देण्यात येईल. सदरील पदे एकत्रित मानधनाची असून कोविड-१९ या साथरोगाच्या कालावधीपुरतेच असल्यामुळे साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास पुढील नियुक्ती देण्यात येणार नाही.

६) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

७) आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदाच्या संख्येत, सामाजिक आरक्षण यात बदल करण्याचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी राखून ठेवले आहे.

८) विहीत नमुन्यातील अर्जासोबत १) वयाचा पुरावा (एसएससी सर्टिफिकेट, पासपोर्ट, वय व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा दाखला.), २) पदवी प्रमाणपत्र, ३) पदवी गुणवत्ता प्रमाणपत्र (मार्क मेमो) ४) कौन्सील नोंदणी प्रमाणपत्र, ५) अनुभव प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार), ६) आधार कार्ड/मतदान कार्ड, ७) जात व जातवैधता प्रमाणपत्र. ८) नॉन क्रिमिलेयअर प्रमाणपत्र. (आवश्यकतेनुसार)

९) आवश्यकतेप्रमाणे जात व जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयअर प्रमाणपत्र (आवश्यकतेप्रमाणे) हे बंधनकारक आहे. ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही अशा उमेदवारांची गणना खुल्या प्रवर्गात करण्यात येईल.

१०) मुलाखत होणार नसल्यामुळे तसेच अर्ज ईमेलद्वारे स्वीकारण्यात येणार असल्यामुळे कोणत्याही उमेदवाराने कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवू नये.

| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | |
|---|---|
| दूरध्वनी :<br>०२४०-२४०२४१२-१७ | पत्ता :<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>पानचक्की रोड, औरंगाबाद |
| ईमेल : deangmca@gmail.com | वेबसाईट : www.gmcaurangabad.com |


११) निवड झालेल्या उमेदवारांच्या पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत अथवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

१२) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी किंवा जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे इ. सर्व अधिकार अधिष्ठाता, शा.वै.म.व रुग्णालय औरंगाबाद यांनी राखून ठेवलेले आहेत.

१३) निवड झालेल्या उमेदवारांची निवासाची व्यवस्था करण्याची जबाबदारी स्वतः उमेदवाराची राहील.

१४) उमेदवारांनी या प्रक्रियेमध्ये सहभाग घेण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा.

- दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करणे.
- भरलेला अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह शक्यतो एकाच पीडीएफ फाईलमध्ये तयार करणे.
- अर्ज gmcaao@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावा.
- पाठविलेल्या ईमेलची उमेदवारांनी प्रिंट ठेवणे.

| Contractual Posts GMCH Hospital AURANGABAD (FOR COVID HOSPITAL BUILDING) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr.No** | **Post** | **Total posts** | **SC** | **ST** | **VJ** | **NT1** | **NT2** | **NT3** | **OBC** | **SEBC** | **EWS** | **OPEN** |
| 1 | DMO-2 (BAMS/BHMS) | 30 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 4 | 3 | 7 |

<table>
<tr><td colspan="2">शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद</td></tr>
<tr><td>दूरध्वनी :<br>०२४०–२४०२४१२–१७</td><td>पत्ता :<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>पानचक्की रोड, औरंगाबाद</td></tr>
<tr><td>ईमेल : deangmca@gmail.com</td><td>वेबसाईट : www.gmcaurangabad.com</td></tr>
</table>

## कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना सन २०२०–२१
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

| पासपोर्ट आकाराचे अलीकडील छायाचित्र |
|---|

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
औरंगाबाद.

पदाचे नाव : .......................................

१) उमेदवारांचे संपूर्ण नाव : ...........................................

२) जन्म तारीख :..............................................

३) पत्ता :.....................................................................

४) शैक्षणिक अर्हता :

| धारण केलेली पदवी अर्हताचा तपशील (सर्व) | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | शेवटच्या वर्षात मिळालेले गुण | शेवटच्या वर्षातील एकूण गुण | शेवटच्या वर्षाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

e-mail ID: ____________________________________

Mobile No: ____________________________________

| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | |
| --- | --- |
| दूरध्वनी :<br>०२४०-२४०२४१२-१७ | पत्ता :<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>पानचक्की रोड, औरंगाबाद |
| ईमेल : deangmca@gmail.com | वेबसाईट : www.gmcaurangabad.com |


६) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमूद करावा)

- वयाचा पुरावा (एसएससी सर्टिफिकेट, पासपोर्ट, वय व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा दाखला.) ☐
- पदवी प्रमाणपत्र, ☐
- पदवी गुणवत्ता प्रमाणपत्र (मार्क मेमो) ☐
- कौन्सील नोंदणी प्रमाणपत्र, ☐
- अनुभव प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार), ☐
- आधार कार्ड/मतदान कार्ड, ☐
- जात प्रमाणपत्र. ☐
- जातवैधता प्रमाणपत्र. ☐
- नॉन क्रिमिलेयअर प्रमाणपत्र. ☐

७) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीचे नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- ........................ स्वाक्षरी :-.....................

दिनांक :- ........................ अर्जदार :-.....................